**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५४/२०१७-१८/45 दिनांक: 14/03/2018

**आदेश**
**आदेश केस क्र. ५४ /२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री राजेंद्र बाळासाहेब सुर्यवंशी(कचरे)<br>मु.पो. ऐतवडे खुर्द ता. वाळवा जि. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभाग इस्लामपूर<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग इस्लामपूर-~~एक~~ दोन | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

5/6/2018

प्रस्तुत प्रकरणाची हकीकत अशी की, तक्रारदाराने सहाय्यक अभियंता शाखा कुरळप ता. वाळवा जि. सांगली यांचेकडे मौजे ऐतवडे खुर्द येथे घरगुती विज कनेक्शन मिळणेकरिता विहीत नमुन्यात अर्ज केला होता. सदरचा अर्ज जावक क्र. ११६ नुसार दिनांक १७.०७.२०१७ नुसार उपकार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. उपविभाग इस्लामपूर-२ यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला सदर संदर्भिय पत्रानुसार तक्रारदाराने दिनांक ३०.०८.२०१७ रोजी उपकार्यकारी अभियंता म.रा.वि.कं.मर्या. उपविभाग इस्लामपूर-२ यांचेकडे विद्युत कनेक्शन मिळणेकरिता अर्ज दिला तथापी त्याबाबत तक्रारदारास कोणतेही उत्तर मिळाले नाही अथवा कोणतीही कार्यवाही देखिल झाली नाही. सबब, तक्रारदाराने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय सांगली यांचेकडे दि. ३०.०९.२०१७ च्या पत्राने तक्रार दाखल केली. सदर तक्रारीची सुनावणी दिनांक ०३.११.२०१७ रोजी होऊन देखिल अद्याप सदर तक्रारीचे आदेश प्राप्त झाला नाही. सबब तक्रारदाराने प्रस्तुत तक्रार या मंचाकडे दि. ०५.१२.२०१७ रोजी दाखल केली आहे. सदर तक्रारीमध्ये तक्रारदाराने नविन कनेक्शन त्वरीत जोडून मिळावे व कृति मानकानुसार विज जोडणी देण्यात आलेल्या उशीरा करिता दंड वसूल करुन मिळावा अशी मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस मिळून देखिल जाबदार वितरण कंपनी तर्फे कोणतेही लेखी निवेदन सादर करण्यात आलेले नाही. तथापि प्रकरण सुनावणीस घेतल्यानंतर आज रोजी विद्युत वितरण कंपनी तर्फे उपकार्यकारी अभियंता इस्लामपूर-२ श्री रमेश कसबे हे हजर झाले व त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा आदेश दि. ०२.१२.२०१७ रोजी प्राप्त झाला असल्याने व तक्रारदास म.रा.वि.वि.कं.च्या उपलब्ध योजने मधून नविन घरगुती विज जोडणी मंजूर करुन कोटेशन देण्यात यावे व कोणतीही योजना उपलब्ध नसल्यास त्या संदर्भात ग्राहकास कळवून व त्यास नॉन डि.डी.एफ. योजनेची माहिती देऊन त्या योजने अंतर्गत कनेक्शन घेणे संदर्भात मार्गदर्शन करावे असे आदेश पारीत झाल्याचे या मंचासमोर निवेदन केले. तसेच त्या आदेशानंतर तक्रारदास सोबत नविन विज कनेक्शन बाबत पत्रव्यवहार करण्यात आल्याचे निवेदन केले. तक्रारदाराने असा काही पत्रव्यवहार झाला असल्याचे स्पष्टपणे नाकबुल केले.

आमच्या निष्कर्षास खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) प्रस्तुतची तक्रार मंजूर करुन विज कनेक्शन देण्यास झालेल्या विलंबाबत कृती मानकानुसार दंडाची आकरणी करुन ती तक्रारदारास देणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय

२) अंतिम आदेश?

उत्तरः- खालील प्रमाणे

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**कारणमीमांसा**

मुद्दा क्र.१ व २ : - प्रस्तुत प्रकरणात संपूर्ण वस्तुस्थिती (Facts) उभयपक्षी मान्य आहेत. तक्रारदाराने नविन घरगुती विज कनेक्शन करिता उपकार्यकारी अभियंता उपविभाग इस्लामपूर-दोन यांचेकडे दिनांक ३०.०८.२०१७ रोजी अर्ज दिलेला आहे. ही बाब विज वितरण कंपनीने मान्य केलेली आहे, तसेच त्या अगोदर देखिल तक्रारदाराने सहाय्यक अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. शाखा कुरळप ता. वाळवा जि. सांगली यांचेकडे नविन घरगुती कनेक्शनकरिता अर्ज दाखल केलेला आहे, व तो अर्ज सहाय्यक अभियंता यांनी उपकार्यकारी अभियंता उपविभाग इस्लामपूर-२ यांचेकडे दिनांक १७.०७.२०१७ रोजी जावक क्र. ११६ अन्वये पुढील कार्यवाहीकरिता पाठविला हे तक्रारदाराचे कथन जाबदार वितरण कंपनीने अमान्य केलेले नाही.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांचा दिनांक ०२.१२.२०१७ च्या आदेशाची प्रत हया मंचाकडे प्राप्त झालेली आहे. तक्रारदारास सदर आदेशाची प्रत प्रस्तुत तक्रार दाखल केल्यानंतर प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. सदर आदेशाचा उल्लेख आम्ही वर केलेलाच आहे. सदर आदेशात अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने विज जोडणी देण्यात झालेल्या विलंबाकरिता दंड बसवून तो तक्रारदारास देण्याबाबत कोणताही आदेश पारीत केलेला नाही. कृती मानके परिशिष्ट 'अ' (२) व ३ अनुसार विज कनेक्शन देण्यात झालेल्या विलंबाबद्दल देय भरपाईबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार विज जोडणी देण्याच्या प्रत्येक टप्प्यांबाबत झालेल्या विलंबाकरिता देय भरपाईची रक्कम नमूद करण्यात आलेली आहे. सदर कृतीमानकांमध्ये कुठल्याही कारणास्तव विलंब झाला असल्यास कोणतीही सवलत देण्यात आलेली नाही. किंवा झालेला उशीर कोणत्याही कारणाकरिता माफ करण्याची तरतूद नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने कृती मानकांकडे साफ दुर्लक्ष केल्याचे दिसते. त्यामुळे सदरचा आदेश मान्य करता येत नाही.

हया मंचाचे मते विलंबाची कारणे कोणतेही असो विज जोडणी देण्याकरिता झालेल्या विलंबाकरिता तक्रारदारास कृती मानकात विहीत केलेल्या देय भरपाई प्रमाणे भरपाई मिळण्यास तक्रारदार पात्र आहे. केवळ आणि केवळ हया कारणाकरिता श्री रमेश कसबे , उपकार्यकारी अभियंता उपविभाग इस्लामपूर-२ यांना हया मंचासमोर आज केलेली निवेदने आणि युक्तिवाद मान्य करता येत नाही. तक्रारदारास नविन विज जोडणी मिळण्यास झालेल्या विलंबाबत दि. ३०.०८.२०१७ म्हणजे त्याने दाखल केलेल्या अर्जाचे पासून विज जोडणी मिळेपर्यन्त प्रत्येक आठवडयास रुपये १०० प्रमाणे भरपाई मिळण्यास तक्रारदार प्राप्त आहे असा हया मंचाचा स्पष्ट निर्देश आहे. सबब प्रस्तुतची तक्रार मंजूर करावी लागेल असा या मंचाचा निष्कर्ष आहे. म्हणून आम्ही मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**आदेश**

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करणेत येत आहे.
२) जाबदार विज वितरण कंपनीने तक्रारदारास हया आदेशाचे तारखेपासून १ महिन्याचे आत नविन विज कनेक्शन द्यावे.

5/3/2018

३) जाबदार वि.कं.ने तक्रारदारास नविन विज कनेक्शन मिळणेबाबत दाखल केलेल्या अर्जाचे तारखेपासून म्हणजे दि. ३०.०८.२०१७ पासून विज कनेक्शन प्रत्यक्ष देण्याच्या तारखेपर्यन्त दर आठवडयास १०० रु. हया दराने भरपाई द्यावी.

४) आदेशाचे पालन झालेनंतर हया मंचास तसा अहवाल सादर करावा.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |